विठठ्लवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/४७५ /२०२६ दि.०३/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हदद्ीत दिनांक ०५/०९/२०२६ रोजी उल्हासनगर ५ धर्मवीर आनंद दिघे चौक, नेताजी चौक या ठिकाणी **गोपाळकाला** सणा निमित्ताने **'दहिहंडी'** उत्सव साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार आहेत. सदर कार्यक्रमाचे वेळी नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहे. नमूद परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) व्हिनस चौककडून धर्मवीर आनंद दिघे चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **व्हिनस चौक व भारत इलेक्ट्रीक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने व्हिनस चौक व भारत इलेक्ट्रिक येथून डावीकडे वळण घेवून शिवनेरी हॉस्पिटल कडून भाटीया चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) हिललाईन पो. स्टे. व मठ मंदिर, उल्हासनगर – ५ कडून धर्मवीर आनंद दिघे चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जुना नेताजी चौक (नेताजी पुतळा)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने मेहर मोटर्स येथून डावे वळण घेवून माणेरेगाव रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) भाटीया चौकाकडून धर्मवीर आनंद दिघे चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अनमोल एस्थेटीक सलुन समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने अनमोल एस्थेटीक सलुन, भाटीया चौक येथुन उजवीकडे वळण घेवून उल्हास स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ४) साई वसंतशाह बंगला कमानी कडून धर्मवीर आनंद दिघे चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जय माताजी ज्युस सेंटर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने साई वसंतशाह कमान येथून डावीकडे वळण घेवून व्हिनस चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना **दि. ०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०८:०० ते दहिहंडी उत्सव संपेपर्यंत** अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर


मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद.
प्रत कार्यवाहीसाठी :–
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.



विठ्ठलवाडी वाहतूक उप विभाग
धर्मवीर आनंद दिघे चौक ते नाना नेगाजी चौक
दही हंडी निमित्त वाहतूक अधिसूचना
नकाशा दि. 05/09/2026